MSBSHS/1668/2025-KOPDB-12-CONF 1/1531764/202

Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्रं.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाइन/ 3890
कोल्हापूर ४१६००४
दिनांक- ०७/११/२०२५ 10

प्रति,

प्राचार्य,
माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान
विषय शिकवणारी सर्व कनिष्ट महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

**विषय-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ माहिती तंत्रज्ञान [ I.T.] व सामान्यज्ञान या विषयांच्या परीक्षेसाठी आपल्या केंद्रावरील भौतिक सुविधांच्या पूर्ततेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी -मार्च २०२६ च्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले असून परीक्षापूर्व तयारी म्हणून माहिती तंत्रज्ञान [ I.T.] व सामान्यज्ञान विषयांची परीक्षा केंद्रे सर्व भौतिक सुविधासह परिपूर्ण असणे आवश्यक आहे. गतवर्षी अनेक [ I.T.] परीक्षा केंद्रावर भौतिक सुविधा नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब गंभीर असून विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने [ I.T.] परीक्षा यशस्वीपणे पार पाडणेसाठी सर्व भौतिक सुविधा परिपूर्ण असणे बंधनकारक आहे. मंडळाकडून आपल्या केंद्रास मान्यता प्रदान करताना केंद्रावर कोणत्या भौतिक सुविधा असणे बंधनकारक आहे याबाबत आपणास अवगत करण्यात आले आहेच. विशेष करून केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षा दालनामध्ये व [ I.T.] लॅबसाठी CCTV पूर्ण क्षमतेने कार्यन्वित असणे बंधनकारक असून त्याचा वेळोवेळी BACKUP घेवून तो संग्रही जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

मंडळाने कार्यक्षेत्रातील सर्वच [ I.T.] परीक्षा केंद्राची भौतिक सुविधा परिपूर्ण असलेबाबत परीक्षेपूर्वी किमान महिनाभर अगोदर पडताळणी करण्याचे निश्चित केले असून त्यासाठी मंडळाचे भरारी पथक आपल्या केंद्रास भेटी देणार आहे. तरी आपणास सुचित करण्यात येते की, आगामी १५ दिवसाचे आत आपले परीक्षा केंद्र आयोजनाच्या दृष्टीने सुसज्ज ठेवावे. पडताळणी अंती ज्या केंद्रावर मंडळ नियमानुसार भौतिक सुविधा नसलेचे निदर्शनास येईल अशी सर्व परीक्षा केंद्रे ऐनवेळी बंद करण्याची कार्यवाही मंडळाकडून केली जाईल व विद्यार्थ्यांच्या होणा-या नुकसानीस सर्वस्वी जबाबदारी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 10-11-2025 13:03:44

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.